**प्रसिध्दी पत्रक** दिनांक २९/०५/२०२४

**आरोपी लोकसेवक**- 1) श्री सुनिल मुलचंद राठोड, व्यवसाय- नोकरी, पोलीस अंमलदार,रा. पोलीस कॉलनी एन-10, 28/3 सिडको, छत्रपती संभाजीनगर, 2) श्री लक्ष्मीकांत हरिश्चंद्र सपकाळ, व्यवसाय नोकरी, पोलीस हवालदार, रा. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, दोघे नेमणुक उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, 3) एक खाजगी ईसम यांनी तक्रारदार यांच्याकडून 15000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपतप्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे गंगापुर, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण गु.र.नं.265/2024 कलम 7,12 भ्र.प्र.अधि.1988 सह 201 भा.दं.वी |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | 1)श्री सुनिल मुलचंद राठोड, व्यवसाय- नोकरी, पोलीस अंमलदार,रा.पोलीस कॉलनी एन-10,28/3 सिडको, छत्रपती संभाजीनगर, 2) श्री लक्ष्मीकांत हरिश्चंद्र सपकाळ, व्यवसाय नोकरी, पोलीस हवालदार, रा. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, दोघे नेमणुक उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, 3) एक खाजगी ईसम |
| लाच मागणी रक्कम | :- | 15,000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | | 15,000/-रुपये. |
| सापळा अधिकारी | :- | श्री. संतोष घोडके, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| सहाय्यक सापळा अधिकारी | :- | श्री. अमोल धस, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांची वाळु वाहतुकीची हायवा गाडी गंगापुर हद्दीमधुन चालु देण्यासाठी व त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करण्यासाठी |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार यांची वाळु वाहतुकीची हायवा गाडी गंगापुर हद्दी मधुन चालु देण्यासाठी तसेच त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करण्यासाठी आलोसे क्र.1श्री सुनिल राटोड क्र.2श्री लक्ष्मीकांत सपकाळ हे तक्रारदार यांच्याकडे 15,000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि.28/05/2024 रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी दरम्यान आ.लो.से. क्र. 1 व 2 यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष 15,000/-रुपये लाचेची रक्कम मागणी करुन स्विकारणे बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे दि.28/05/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. क्र1 श्री सुनिल राटोड, आलोसे क्र.2 श्री लक्ष्मीकांत सपकाळ यांनी खाजगी ईसमा मार्फत 15,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारुन लाचेच्या रकमेसह मोटार सायकल वरुन पळुन गेले आहेत. तक्रारदार यांचे फिर्यादी वरुन पोलीस ठाणे गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे गु.र.नं. 265/2024 कलम 7,12, भ्र.प्र.अधि.1988 सह कलम 201 भा.दं.वी. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकुंद आघाव, पोलीस उप अधीक्षक संगीता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री संतोष घोडके, सहाय्यक सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री अमोल धस यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार भिमराज जिवडे, अशोक नागरगोजे, केवलसिंग गुसिंगे, पो.अं. युवराज हिवाळे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103

पोलीस उप अधीक्षक :- 8766755515


**( संगीता पाटील )**
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.